# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २६ मार्च, २०२५ / चैत्र ५, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **वैद्यकीय शिक्षण मंत्री** | |
| **(२)** | **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** | |
| **(३)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |
| **(४)** | **उद्योग, मराठी भाषा मंत्री** | |
| **(५)** | **महिला व बालविकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(६)** | **ग्रामविकास व पंचायत राज मंत्री** | |
| **(७)** | **कामगार मंत्री** | |
| **(८)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |

---------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - ३४**

---------------------------------

### ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर ) येथे महिला व बाल रूग्णालय मंजूर करणेबाबत

**(१) * ४१०८ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील एकमेव महिला व बाल रूग्णालयामध्ये गडचिरोली व चंद्रपूर तालुक्यातील रूग्ण उपचारासाठी येत असून बऱ्याच वेळा गंभीर आजार असलेल्या रूग्णांचा उपचाराअभावी वाटेतच मृत्यू होत असल्याने तालुक्याच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या ब्रम्हपूरी येथे १०० खाटांचे महिला व बाल रूग्णालय मंजूर करावे अशी मागणी लोकप्रतिनिधींसह नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ब्रम्हपूरी परिसरातील शासकीय जागा असलेल्या बोडेगाव येथील सर्वे नंबर ४११ या जागेवर नवीन १०० खाटांचे महिला व बाल रूग्णालय मंजूर करण्यात यावे असे निवेदन लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री आणि अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार ब्रम्हपूरी येथे सर्व सोयीसुविधा असलेले १०० खाटांचे महिला व बाल रूग्णालय मंजूर करण्यसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलाबांची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) मा. लोकप्रतिनिधी यांनी जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांचे कार्यालयास दि. ३०/०१/२०२५ रोजीचे निवेदन/पत्रान्वये प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत मागणी केली आहे.

(२) व (३) उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर यांच्या स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. प्रस्ताव शासन स्तरावर प्राप्त होताच निकष तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-२) अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते वितरित करणेबाबत

**(२) * १२८९ श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली आबा कटके (शिरुर), श्री.गोपिचंद पडळकर (जत), डॉ.बाबासाहेब देशमुख (सांगोले), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-२) अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात २१,७९९ घरकुलांना ऑनलाईन मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी १८,३०३ जणांना पहिला टप्पा, ३१३९ लाभार्थ्यांना दुसरा टप्पा व ७७८ जणांना तिसऱ्या टप्प्याचे अनुदान देण्यात आले असून अद्यापही ४,८०६ लाभार्थ्यांना एकही टप्प्याचे अनुदान मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच, पुणे जिल्ह्यातील मंजूर घरकुलाच्या अनुदानासाठी अडीच हजार लाभार्थी प्रतिक्षेत असून सन २०२४-२५ च्या मंजूर घरकुलांच्या लाभार्थ्यांना पहिला हप्ता अद्याप मिळाला नसल्याने घरकुलाचे काम अद्याप सुरु करता आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सांगली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-एक) अंतर्गत २०,४२६ घरकुलांना ऑनलाईन मंजुरी मिळाली असून यापैकी १८,७३३ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत तर १,६९२ घरकुलांची कामे अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, सोलापूर जिल्ह्यातील पंतप्रधान आवास योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या घरांचे सन २०१८-१९ ते २०२४-२५ या कालावधील रुपये १८३ कोटी २९ लाख इतके अनुदान थकले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, नांदेड जिल्हयातील प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-२) अतंर्गत ४८,७७१ घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून ६२३ लाभार्थ्यांना अद्यापही तिसरा व चौथा हप्ता मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार लाभार्थ्यांना घरकुलाचे हप्ते तात्काळ वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) अमरावती जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा २) अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात ४८,५०६ घरकुलांना ऑनलाईन मंजूरी देण्यात आली असून त्यापैकी ३९,९८० लाभार्थ्यांना पहिला हप्ता, ४,२३७ लाभार्थ्यांना दुसरा हप्ता व १,३७८ लाभार्थ्यांना तिसऱ्या हप्त्याचे अनुदान देण्यात आले असून त्यापैकी ३६६ लाभार्थ्यांचे घरकुल पूर्ण झालेले आहे. उर्वरीत लाभार्थ्यांना प्रथम हप्ता देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

पुणे जिल्ह्यात सन २०२४-२५ मध्ये प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत ३३,६७६ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी २४,०८१ लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरीत केला आहे. उर्वरीत लाभार्थींना प्रथम हप्ता देणेची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण (टप्पा-एक) अंतर्गत २०,४२१ घरकुलांना ऑनलाईन मंजुरी मिळाली असून यापैकी १८,७५४ घरकुलांची कामे पूर्ण झाली आहेत,व १,६६७ घरकुलाची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) हे खरे नाही.

(५) नांदेड जिल्हयासाठी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा-२ अंतर्गत १,५०,३८२ प्राप्त उद्दिष्टांपैकी १,४२,६६४ लाभार्थ्यांना ऑनलाईन मंजुरी दिलेली असुन १,१९,८८३ लाभार्थ्यांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुलांचे काम केलेले आहे त्यांच्या बांधकामाच्या टप्प्यानुसार दुसरा हप्ता ५,५१६ लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आलेला आहे. १,१९४ लाभार्थ्यांना तिसरा हप्ता व ६३ लाभार्थ्यांना चौथा हप्ता वितरीत करण्यात आलेला आहे. ६०४ घरकुले पुर्ण करण्यांत आलेली आहेत.

(६) प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण टप्पा २ अंतर्गत सप्टेंबर २०२४ मध्ये ६,३७,०८९ उद्दिष्ट व जानेवारी २०२५ मध्ये १३,२९,६७८ उद्दिष्ट असे एकूण १९,६६,७६७ उद्दिष्ट प्राप्त असून आजअखेर १८,२२,५२५ (९२.६६%) लाभार्थ्यांच्या मंजूरीची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असून, १४,६९,३५१ इतक्या लाभार्थ्यांना प्रथम हप्ता वितरीत करण्यात आला आहे. तसेच उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत निधीची कोणत्याही प्रकारची अडचण नाही.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामांबाबत

**(३) * २११२ श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत झालेली अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट कामांची चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी करुनही सदर प्रकरणी चौकशी न करता सदर कामांची देयके देखील अदा केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे :** (१),(२) व (३) खरे नाही, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे बांधकाम साहित्य व कामांची राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचेमार्फत तपासणीअंती समाधानकारक शेरा प्राप्त झाल्यानंतरच देयक अदा करण्याची कार्यवाही करण्यात येते.

(४) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## कुरकुंभ (ता. दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रात अल्काइन अमाइन केमिकल्स लि. या कंपनीमध्ये झालेल्या स्फोटाबाबत

**(४) * ५१०१ श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरकुंभ (ता. दौंड, जि.पुणे) येथील औद्योगिक क्षेत्रात अल्काइन अमाइन केमिकल्स लि. या कंपनीमध्ये दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास झालेल्या भीषण स्फोटात अनेक कामगार जखमी झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील औद्योगिक क्षेत्रात यापूर्वी देखील अनेक वेळा केमिकलच्या साठयाचे स्फोटाच्या घटना घडल्या असनूही एम.आय.डी.सी प्रशासनाकडून अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, या परिसरातील अनेक कंपन्यांचे फायर ऑडीट देखील वर्षानुवर्षे करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्फोटातील जखमींना आर्थिक मदत देणे, कंपन्यांचे फायर ऑडीट करणेसह यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) दि.२८.१२.२०२४ रोजी अल्काइन अमाइन केमिकल्स लि. कुरकुंभ एमआयडीसी जि. पुणे या कारखान्यात झालेल्या स्फोटात श्री. सागर रणबावरे हे गंभीर जखमी झाले होते. सदर कामगाराचा उपचारादरम्यान दि. २९.१२.२०२४ रोजी मृत्यू झाला.
(२) व (३) कुरकुंभ औद्योगिक क्षेत्रात एमआयडीसीमार्फत अग्निशमन केंद्र बांधून कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर अग्निशमन केंद्रात एक फोम टेंडर, एक वॉटर टेंडर व एक जीप इ. वाहने व अग्निशमन/बचाव उपकरणे उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. कुरकुंभ अग्निशमन केंद्रात ११ अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती केली असुन सदर अधिकारी/कर्मचारी औद्योगिक क्षेत्रात उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीस सामोरे जाण्यास २४ तास ऑनकॉल उपलब्ध असतात. याशिवाय महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ यामध्ये सन २००६ ते सन २०२३ पर्यंत फायर ऑडीट करण्याबाबत कोणतीही तरतूद नव्हती. या कायद्यामध्ये २०२३ मध्ये सुधारणा करण्यात आली असून अग्निसुरक्षा व्यवस्था परीक्षण (फायर ऑडीट) करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. तथापि याबाबतचे नियम अद्याप अंतिम झाले नसल्याने याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने कळविले आहे.

तथापि, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभागाकडून कारखान्यांचे केंद्रीय निरीक्षण प्रणालीद्वारे (CIS) निरीक्षण केले जाते. या निरीक्षणादरम्यान कारखान्याचे व्यवस्थापक यांना कारखान्यामध्ये इंटरनल सेफ्टी ऑडीट व मान्यताप्राप्त सुरक्षा लेखा परिक्षकाकडून एक्स्टर्नल सेफ्टी ऑडीट करण्याबाबत निर्देश दिले जातात व त्याचा पाठपुरावा केला जातो.
(४) सदर अपघातात मृत झालेल्या श्री. सागर रणबावरे यांच्या वारसदारास रुपये ५० लाख देण्याचे कारखाना व्यवस्थापनाने कळविले आहे. तसेच या घटनेच्या अनुषंगाने कारखान्याचे भोगवटादाराविरूध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ आणि The Maharashtra Factories (Control of Industrial Major Accident Hazardous) Rules २००३ नुसार तीन खटले माननीय न्यायदंडाधिकारी, शिवाजीनगर, पुणे यांच्याकडे दाखल करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विशेषत: नागपूर जिल्ह्यात महिलांमध्ये गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याबाबत**

**(५) * ५६२ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनेक ठिकाणी विशेषत: नागपूर येथे महिलांमध्ये गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत असून मागील तीन वर्षांत या आजाराच्या १,३०६ रुग्णांची नोंद झाली असल्याचे माहे डिसेंबर,२०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आकडेवारी केवळ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विभागीय कर्करोग रुग्णालयातील असून नागपूर येथे कर्करोगवरील उपचाराची सुमारे सात ते आठ रुग्णालये असून रुग्णांची आकडेवारी यापेक्षा कित्येक पटीने जास्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आजारावर नियंत्रण मिळविणे, कर्करोग रुग्णालयांची संख्या वाढविणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे अंशतः खरे आहे,

पॉप्युलेशन बेस्ड कॅन्सर रजिस्ट्री (२०१२-१६) च्या अहवालानुसार नागपूर ग्रामीण भागात प्रतिलक्ष ९१.१ पुरुषांना आणि प्रतिलक्ष ८९.८ महिलांना कर्करोग होत असल्याचे आढळून आले आहे.
(३) राज्यात असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रमाद्वारे कर्करोग आरोग्य सेवा दिल्या जातात. त्यात प्रामुख्याने ३० वर्षापेक्षा अधिक वयोगटातील महिलांचा स्तन कर्करोग, गर्भाशयमुख कर्करोग तपासणी केली जाते आणि पुरूषांची मुख कर्करोग तपासणी केली जाते. तपासणी अंती कर्करोग सदृश्य रुग्णांना कर्करोग निदान आरोग्य सेवा आणि उपचार सेवा या संदर्भात आरोग्य सेवा मार्फत शासकीय रुग्णालयात आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत सल्लग्न रुग्णालयांमार्फत दिल्या जातात.तसेच जिल्हा रुग्णालय स्तरावर किमो थेरेपी सेंटर सुरू करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील मनोरुग्णालयाची देखभाल व दुरुस्ती करणेबाबत

**(६) * १७६४ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.रामदास मसराम (आरमोरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील मनोरुग्णालयाच्या इमारतीची दुरवस्था झाली असून तेथे पाणी गळती व अन्यप्रकारे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रुग्णालयाच्या देखभाल व दुरुस्तीचे काम गत २ वर्षांपासून अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रुग्णालयाची देखभाल व दुरुस्ती करुन त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन देखभाल व दुरुस्तीकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

ठाणे येथील प्रादेशिक मनोरुग्णालयातील पुरुष रुग्ण कक्ष ११ व ७ च्या छतामधून पाणी गळती होत असल्याची बाब माहे जुलै,२०२४ मध्ये निदर्शनास आली होती. तथापि, सदर कक्षातील रुग्णांना त्वरीत इतर कक्षात स्थलांतरीत करण्यात आल्यामुळे मनोरुग्णालयातील मनोरुग्णांची गैरसोय झालेली नाही.
(२) व (३) प्रादेशिक मनोरुग्णालय, ठाणे येथील सर्व जीर्ण व मोडकळीस आलेल्या इमारतींचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या क्षतिग्रस्त संरचनात्मक परिरक्षण अहवालानुसार इमारतीच्या रचनात्मक दुरुस्तीकरीता सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दि.०३/१२/२०२१ अन्वये पुरुष कक्ष

क्र.८अ,१३,१४,१५,१९ तसेच महिला कक्ष क्र.१६,१७,१८,१९,२० या कक्षांकरीता रुपये रु.१४,३४,७५,८५९/- इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. यानुसार दुरुस्तीची कामे करण्यात आलेली आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तारापूर (जि.पालघर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूखंडाचा झालेला गैरवापर

**(७)** * **४८६९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तारापूर (जि.पालघर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत औद्योगिक वापरासाठी वितरीत केलेल्या भूखंडाचा एसटीएस ॲटोमोबाईल, पीडी इंडस्ट्रीज आदि आस्थापनांनी गैरवापर करुन बेकायदेशीररित्या वाणिज्यिक वापर केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी एमआयडीसी तर्फे सदरहू कंपन्यांना नोटीसा बजावण्यात येऊनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अटी शर्तींचे उल्लंघन करुन दिलेल्या भूखंडाचा विहित प्रयोजनासाठी वापर न केल्याबाबत सदरहू कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन भूखंड गैरवापर, महसूलाचे नुकसान, भूखंड ताब्यात घेणे यासह संबंधित दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय हे खरे आहे .

म.औ.वि. महामंडळाने औद्योगिक क्षेत्रातील इमारतीतील क्षेत्र पोटभाडयाने देणेबाबत दिनांक १९/१०/२००९, दि.२६/५/२०१०, दि.१७/११/२०१४ च्या परिपत्रकाद्वारे मार्गदर्शक तत्वे निर्गमित केलेली आहे. तसेच भूखंडाचे औद्योगिक ते व्यापारी रुपांतर करणेबाबत परिपत्रक दिनांक २४/२/२०२५ नुसार मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. सदर परिपत्रकातील निर्देशानुसार तारापूर औद्योगिक क्षेत्रातील ज्या भूखंडधारकांनी म.औ.वि. महामंडळाची परवानगी न घेता औद्योगिक भूखंडावर व्यापारी वापर सुरु केला आहे अशा एकूण ८ भूखंडधारकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

सदर नोटीसीच्या अनुषंगाने म.औ.वि.महामंडळाकडून खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- म.औ.वि. महामंडळाने अनधिकृत व्यापारी वापराची दंडात्मक रक्कम रुपये ८१,७३,९१९/- वसुल केली आहे.
- दंडात्मक रक्कम भरणा केल्यानंतर भूखंड क्रमांक जे-१७६ चे धारक यांनी अनधिकृत व्यापारी वापर बंद केला आहे.
- भूखंड क्रमांक जे-२०३ आणि जे-२२३ यांनी म.औ.वि. महामंडळाकडे औद्योगिक ते व्यापारी वापरात बदल करणेबाबत प्रस्ताव सादर केला असून त्यापैकी जे-२०३ चे धारक यांचा प्रस्ताव म.औ.वि. महामंडळाने मान्य केला असून त्यासाठी रुपये ८,०६,१७,६००/- इतकी रक्कम भरणेचे मागणी पत्र दिनांक २८.२.२०२५ रोजी निर्गमित करण्यात आले आहे. तसेच भूखंड जे-२२३ चे भूखंडधारक यांचा औद्योगिक भूखंडावरुन व्यापारी रुपांतरणाबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे.

म.औ.वि. महामंडळाने अनधिकृत व्यापारी वापर करणा-या भूखंडधारकास नोटीस बजावल्यानंतर रुपये ८१,७३,९१९/- इतका महसूल प्राप्त झाला असून रक्कम रुपये १,४२,०२,४२१/- भरणा करणेसाठी नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच भूखंड क्रमांक जे-२०३ यांचे विनंतीनुसार सदर भूखंड व्यापारी प्रयोजनामध्ये

रुपांतरणास महामंडळाने परवानगी दिली असून त्यासाठीचे शुल्क रुपये ८,०६,१७,६००/- भरणा करणेसाठी दिनांक २८/२/२०२५ रोजी मागणी पत्र निर्गमित करण्यात आले असून, भूखंड क्रमांक जे-२२३ यांचा औद्योगिक ते व्यापारी रुपांतरणासाठीच्या प्रस्तावावर म.औ.वि. महामंडळाच्या धोरणानुसार कार्यवाही सुरु आहे.

१. मऔवि महामंडळाने दिनांक २४/२/२०२५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे औद्योगिक ते व्यापारी भूखंडाचे रुपांतरणासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वे निर्गमित केले असून पूर्वीच्या १.५ पट वरुन २.० पट दरातील फरक वसुलीबाबत निर्णय घेतलेला आहे. यामुळे महामंडळास भूखंडाचे रुपांतरणामधून मोठया प्रमाणात महसूल प्राप्त होणार आहे.

२. मऔवि महामंडळाने नोटीसेस बजावल्यानंतर व्यापारी पोटभाडयाबाबतची रक्कम भूखंड क्रमांक जे-९६, जे-१६५, जे-२०३, जे-२२३ आणि जे-२३४ यांनी भरणा केलेली आहे.

३. म.औ.वि. महामंडळाने अनधिकृत व्यापारी वापर करणाऱ्या भूखंडधारकास नोटीस बजावल्यानंतर रुपये ८१,७३,९१९/- इतकी रक्कम वसुल केली आहे. तसेच भूखंड क्रमांक जे-१७६ यांनी अनधिकृत पोटभाडयाची रक्कम भरणा केली नसल्याने म.औ.वि. महामंडळासोबत केलेल्या करारनामामधील अटी व शर्तीचा भंग केल्याने सदर करार रद्द करणेबाबतची नोटीस निर्गमित करण्यात आली आहे. सदर भूखंडाचे धारक यांनी भूखंडावरील अनधिकृत व्यापारी वापर बंद केला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिराळा व वाळवा (जि.सांगली) तालुक्यातील पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतर करुन पाणी टंचाई दूर करणेबाबत

**(८)** * **५९२६ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा व वाळवा (जि.सांगली) तालुक्यात पाझर तलावांची दुरवस्था होऊन तलावातील पाण्याची पातळी कमी होत असल्याने स्थानिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी मोठया प्रमाणात पाऊस पडूनही पाझर तलावांच्या दुरवस्थेमुळे पाण्याची साठवण क्षमता कमी होत असूनही संबंधित विभागाकडून सदरहू तलावांची गळती थांबविण्याबाबत कोणतीही कार्यवाही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुषंगाने उक्त ठिकाणचे पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतरण केल्यास पाणीसाठयात वाढ होऊन शेतकऱ्यांचे बरेच क्षेत्र ओलिताखाली येऊन सिंचनाचा प्रश्न मिटून नागरिकांच्या व जनावरांच्या पाण्याचा गंभीर प्रश्न कायमस्वरुपी सुटण्यास मदत होणार असल्याने स्थानिक नागरिकांनी यापूर्वी शासनाकडे वारंवार लेखी निवेदनाद्वारे तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शिराळा व वाळवा तालुक्यातील सर्व पाझर तलावांचे साठवण तलावात रुपांतरण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) पाणी टंचाईचा प्रश्न नाही. तथापि, लोकप्रतिनिधीची मागणी आहे.

(४) पाझर तलावाचे मूळ उद्दीष्ट ना-दुरुस्त पाझर तलाव भू-जल, पुर्नभरण करणे असा आहे. त्यामुळे साठवण तलावात रुपांतर न करता ना-दुरुस्त पाझर तलावाचे लोकप्रतिनिधीनी मागणी केल्याप्रमाणे पाझर तलावांची दुरुस्ती आवश्यकतेनुसार करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये निधीअभावी लसींचे उत्पादन होत नसल्याबाबत**

**(९)** * **४४७७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हाफकिन इन्स्टिट्यूटमध्ये निधी व आवश्यक संसाधनांचा अभाव तसेच जुन्या यंत्र सामुग्रीमुळे लसींचे उत्पादन होत नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लसींच्या उपलब्धतेअभावी नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन लस उत्पादनासाठी हाफकिन इन्स्टिट्यूटल निधी, आवश्यक संसाधने, यंत्र सामुग्रीची उपलब्धता करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. नरहरी झिरवाळ :** (१) हे खरे नाही.

सन २०१९ आणि सन २०२३ मध्ये झालेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या परीक्षणात महामंडळाच्या उत्पादन पद्धतीमध्ये सुधारणा करुन नवीन उत्पादन संयत्र घेण्याचे सुचविलेले आहे. त्यानुषंगाने पोलिओ लस विभागाचे नुतनीकरण करण्याचे काम प्रगती पथावर आहे. सदरहू कामकाज माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत पूर्ण करुन उत्पादन सुरु करण्याचे हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाचे उद्दिष्ट आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पोलिओ लस उत्पादन सयंत्र मागवून ते स्थापित करण्याची कार्यवाही हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळामध्ये सुरु आहे. तसेच हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाच्या नुतनीकरणासाठी रुपये १५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौ. पाटेगाव व खंडाळा (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत**

**(१०)** * **६१६५ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ. पाटेगाव व खंडाळा (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील ६२० हेक्टर क्षेत्रावर औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यास उच्चाधिकार समितीने तत्वतः मान्यता देऊनही सदर औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना विभागामार्फत अद्यापही काढण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे या भागात येणारे इच्छूक उद्योग व्यावसायिकांना औद्योगिक क्षेत्र उपलब्ध झाले नाही तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होवू शकला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कर्जत औद्योगिक क्षेत्राची अधिसूचना जारी करून उद्योग स्थापन करण्याबाबत स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींकडून करण्यात आलेल्या मागणीच्या अंमलबजावणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्जत येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) मौजे पाटेगाव व खंडाळा येथील खाजगी व सरकारी एकूण असे एकूण ४५८.७२ हे.आर क्षेत्रास मऔव अधिनियम प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतूदी लागू करण्यास अटीच्या अधीन राहून उच्चाधिकार समितीने दि.१४/०७/२०२२ रोजीचे १४३ व्या बैठकीत तत्वत: मान्यता दिली होती. त्यानुसार प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता.

दरम्यान पाटेगांव ग्रामपंचायतीने या ठिकाणी एमआयडीसी स्थापन करण्यास विरोध असल्याचे दि. ०३/०८/२०२३ रोजी शासनास कळविले. कर्जत तालुक्यामध्ये उद्योगधंदे व रोजगार निर्मीती होणेसाठी औद्योगिकदृष्टया संपादनायोग्य पर्यायी जमिनी स्थळ पाहणी करण्याचे निर्देश दि. २८/०२/२०२४ रोजीच्या शासन स्तरावरील बैठकीत देण्यात आले.

त्यानुसार कर्जत औद्योगिक क्षेत्राकरीता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थळ पाहणी करुन उच्चाधिकार समितीच्या मान्यतेने प्रस्तावित केल्यानुसार कर्जत तालुक्यातील मौजे कोंभळी येथील १६८.२३ हे.आर व मौजे खांडवी येथील ७७.८२ हे.आर खाजगी अशी एकूण २४६.०५ हे.आर क्षेत्राची मऔवि अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) ची अधिसूचना दि.१४/१०/२०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार सदर भूसंपादनाची पुढील कार्यवाही उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, कर्जत यांचे मार्फत सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयाच्या गेटवर खासगी पॅथॉलॉजिस्टकडून होत असलेला गैरप्रकार

**(११)** * **३५४७ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सर जे.जे.रुग्णालयाच्या गेटवर खाजगी पॅथॉलॉजिस्टकडून राजरोसपणे तपासणी करण्यात येत असून रुग्णालयातील डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हा प्रकार सुरु असून रुग्णांची आर्थिक लूट करण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यासाठी रुग्णालय प्रशासनाने स्थापन केलेल्या समितीच्या तपासणीत ही बाब खरी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन खाजगी पॅथॉलॉजिस्ट व यातील दोषी डॉक्टर व वैद्यकीय कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील गावांमध्ये दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याबाबत

**(१२) * ६१०९ श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्जुनी मोरगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील नवेगाव बांध, शिरेगाव बांध व पिंपळगाव येथील पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून २८ गावांना दूषित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावांना जलाशयाचे गढूळ पाणी, शेतातील कीटकनाशक व विषयुक्त पाणी पुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी पाणीपुरवठा विभागाकडे करुनही संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोहळी टोला व नवेगाव बांध ला अंदाजे २० एकरचे अतिक्रमण झाल्याने तसेच बुडीत क्षेत्राची सीमा निश्चित करून सदर जलाशयाची जागा अतिक्रमणमुक्त करण्याची आवश्यकता असताना ही जमीन महसूल, पाणीपुरवठा व सिंचन यापैकी निश्चित कोणत्या विभागाची आहे याची अद्याप निश्चिती न झाल्याने विभागांच्या अंतर्गत वादामुळे याकडे शासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

अर्जुनी-मोरगाव या तालुक्यातील सिरेगाव व खांबी या २ पाणी पुरवठा योजनेंतर्गत २४ गावे व ४ वाडयांना तसेच पिंपळगाव येथील पाणी पुरवठा योजनांतून जल शुद्धीकरण केंद्राद्वारे प्रक्रिया करुन पाण्याचा पुरवठा केला जातो.

(२) हे खरे नाही.

सदर २८ गावांना जलशुद्धीकरण केंद्राद्वारे शुद्धीकरण करुन पाण्याच्या गुणवत्तेच्या विहीत मानकांनुसार पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच, वर्षातून एकवेळा पाण्याची रासायनिक व दोनवेळा जैविक तपासणी केली जाते. सदर योजनेच्या ऑक्टोबर, २०२४ व जानेवारी, २०२५ या महिन्यांच्या पाणी नमुन्याच्या तपासणी अहवालानुसार पाणी पिण्यायोग्य असल्याचा अहवाल प्राप्त आहे.

(३) अंशत: खरे आहे.

नवेगावबांध तलावाच्या बुडीत क्षेत्रात कोहळीटोला व नवेगावबांध येथे अतिक्रमण झाले आहे. बुडीत क्षेत्राचे सीमांकन झाले नसल्यामुळे, अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्याचे काम महसूल विभाग व जलसंपदा विभाग संयुक्तपणे करीत आहेत. सद्यःस्थितीत सदर कार्यवाही तहसीलदार, तालुका अर्जुनी/मोरगाव यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

(४) सदर २८ गावांना जलशुद्धीकरण केंद्राद्वारे प्रक्रिया करुन पाणी पुरवठा करण्यात येतो. तसेच, जलशुद्धीकरण केंद्रामध्ये वेळोवेळी पाण्याची जैविक व रासायनिक तपासणी करुन पाणी पुरवठा करण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील गावांना फ्लोराईडयुक्त पिण्याच्या पाण्यामुळे हाडांचे विकार होत असल्याबाबत

**(१३) * ५६०९ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळापूर (जि.यवतमाळ) तालुक्यातील गावांना फ्लोराईडयुक्त पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे नागरिकांना हाडांचे विकार होत असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावांना शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव पाटील :**(१) हे अंशत: खरे आहे.

केळापूर (जि. यवतमाळ) तालुक्यातील २१ गावातील ४८ स्त्रोत फ्लोराईड बाधित आढळून आले होते. अशा स्त्रोतांना लाल रंग देऊन, “पिण्यास अयोग्य” असे दर्शविण्यात आले असून हे स्त्रोत बंद करण्यात आले आहेत.

(२) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागाकडील माहितीनुसार, फ्लोराईड युक्त पिण्याच्या पाण्यामुळे हाडाचे विकार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(३) केळापूर (जि. यवतमाळ) तालुक्यातील फ्लोराईड बाधित स्त्रोत आढळून आलेल्या २१ गावांत २३० पिण्यास योग्य असलेले पर्यायी स्त्रोत उपलब्ध करुन देण्यात आले असून, ग्रामपंचायतीमार्फत पाण्याचे नियमित शुध्दीकरण करुन जनतेला शुध्द पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोळखे (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांनी अपहार केल्याबाबत

**(१४) * २८८५ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोळखे (ता.पनवेल, जि.रायगड) ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी यांनी पदाचा गैरवापर करून लाखो रूपयांचा अपहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम ३९(१) नुसार कारवाई करणेसाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.) राजिप अलिबाग यांचेकडे दिनांक ११ मार्च, २०२४ रोजीच्या पत्रान्वये पुरावे सादर केल्यानंतर सदर प्रकरणी गट विकास अधिकारी, (उश्रे), पनवेल यांनी दिनांक ५ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास चौकशी करून सादर केलेल्या अहवालात लाखो रूपयांचा अपहार झाल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवाल सादर करुन बराच कालावधी होऊनही संबंधित दोषींवर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

श्री.राजेंद्र हरश्चिंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य, मु.कोळखे, ता. पनवेल यांनी कोळखे ग्रामपंचायतीच्या अनियमितता संदर्भात दि.११/०३/२०२४ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल यांनी चौकशी करुन दि.०५/०७/२०२४ व दि.०८/०८/२०२४ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला. सदर चौकशीत या प्रकरणी आर्थिक अपहार झालेला नसून प्रशासकिय अनियमितता झाली असल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) नाही, हे खरे नाही.

(४) संबधित सरपंचाविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ चे कलम ३९ (१) नुसार विभागीय आयुक्त कोकण विभाग यांच्याकडे दि.१७/०३/२०२५ रोजी सुनावणी झाली असून, अंतिम निर्णय प्रलंबित आहे. तसेच कोळखे ग्रामपंचायतीचे तत्का. ग्रामविकास अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उदगीर (जि.लातूर ) येथील ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित करणेबाबत

**(१५) * ३३५७ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (जि.लातूर) येथे महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवरील रुग्णांकरीता सुमारे रुपये ५ कोटी खर्च करुन ट्रॉमा केअर सेंटरची उभारणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त सेंटरामध्ये आवश्यक साधनसामुग्री, सोयीसुविधा व मनुष्यबळ उपलब्ध करुन न दिल्याने गत २ वर्षांपासून सदर ट्रॉमा केअर सेंटर कार्यान्वित झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे परिसरातील गरीब व गरजू रुग्णांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असून त्यांना अन्य ठिकाणी खाजगी रुग्णालयांमध्ये अवाजवी दराने उपचार घ्यावे लागत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ट्रॉमा केअर सेंटरमध्ये सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करुन ते तातडीने कार्यान्वित करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) सदर ट्रॉमा युनिट, उदगीर करिता आवश्यक मुनष्यबळाची निर्मिती शासन निर्णय दि. २३/०५/२०१८ अन्वये करण्यात आली असून तसेच सदरहू ट्रॉमा केअर सेंटर करीता आवश्यक यंत्रसामुग्री व साधन खरेदी ही सन २०२४-२०२५ जिल्हा वार्षिक योजना मधील प्राप्त झालेल्या निधीतून खरेदी करण्यात आलेली असून सदरहू सेंटर कार्यान्वित करण्यात आले असून त्यामार्फत सेवा देण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही. ट्रॉमा केअर युनिट, उदगीर मधून उपलब्ध मुनष्यबळ व यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने रूग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

(४) ट्रॉमा केअर युनिट, उदगीर मधून उपलब्ध मुनष्यबळ व यंत्रसामुग्रीच्या सहाय्याने सदरहू सेंटर कार्यान्वित करण्यात आले असून त्यामार्फत रूग्णसेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे भादाणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क प्रकल्प उभारणेबाबत**

**(१६)** * **२५३६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी शहर हे उद्योग व्यवसायाचे प्रमुख केंद्र असून सदरहू परिसर थेट महामार्गाला जोडलेला असल्याने मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क उभारण्यासाठी तेथे पोषक वातावरण असल्याने उक्त पार्कची उभारणी झाल्यास उद्योगाला चालना व स्थानिकांना रोजगार मिळण्यास मदत होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे भादाणे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथे मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क उभारण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील स.नं./हि.नं. २०, ९५, १६२, २१६ व २५२ या जागेवर जमीन किनारपट्टी नियमन क्षेत्र (CRZ) व कोणत्याही प्रकारचे आरक्षण नसून सदरहू जागा प्रस्तावित करण्याबाबत स्थानिक ग्रामस्थांनी सहमती दर्शविली असून त्याबाबतची मागणी देखील शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ठिकाणी मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क प्रकल्प उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना निवेदन देवून भिवंडी शहराच्या परिसरात मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क उभारणीसंदर्भात कार्यवाही होणेची मागणी केली आहे. भिवंडी शहर हे विमानतळ, बंदर व दळणवळणाच्या दृष्टीने अतिशय सुयोग्य ठिकाण असल्याने त्याठिकाणी लॉजिस्टिक पार्क स्थापन करणेबाबत कार्यवाही होणे आवश्यक असल्याची मागणी निवेदनाव्दारे केली आहे.
(३) व (४) भिवंडी तालुक्यात मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्क स्थापन करण्याच्या अनुषंगाने जागांची पाहणी करुन सुयोग्य जागा कळविणेबाबत मुख्यालयामार्फत प्रादेशिक अधिकारी, ठाणे-२ यांना निर्देश देण्यात आले होते.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत भिवंडी तालुक्यातील मौजे वाशेरे, सापे, पिसे, आतकोळी व भदाने, येथील सरकारी १०३.३७ हे. आर व खाजगी ११७.२६९ हे. आर असे एकूण २२०.६३९ हे. आर क्षेत्राची भूनिवड समितीमार्फत पाहणी करणेत आली. सदर क्षेत्रास उद्योजकांच्या मागणीनुसार Pass-through पध्दतीने भूसंपादन करणेस महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करणेस उच्चाधिकार समितीच्या १६८ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच सरकारी १०३.३७ हे. आर क्षेत्र जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरण करण्यासाठी कार्यवाही करणेचे निर्देश दिले आहेत.

मौजे भादाणे, ता.भिवंडी येथील सर्व्हे नं. २०,९५,१६२,२१६ एकूण क्षेत्र ५०.९०.०० हे.आर येथील सरकारी जमिनीची प्रादेशिक कार्यालयातील भूमापक व इतर अधिकारी यांनी पाहणी केली असता, सदर क्षेत्र हे गुरचरण क्षेत्र असून, त्या जमीनी ग्रुप ग्रामपंचायत भादाणे-वांद्रे यांचेकडे शासनाने वर्ग केलेल्या आहेत व त्यानुसार जमीनीचे ७/१२ ला कब्जेदार सदरी गुरचरण ग्रामपंचायत भादाणे-वांद्रे अशा नोंदी आहेत. तसेच सर्व्हे नं.

२५२/१अ क्षेत्र ०-४०-० आर ही जमीन मसणवटा (स्मशानभूमी) म्हणून ७/१२ ला कब्जेदार सदरी दाखल आहे.

उपरोक्त जमीनीची पाहाणी करता या जमीनी गुरचरण क्षेत्राच्या असून, त्या जमीनी विखुरलेल्या स्वरुपात असल्यामुळे जमीनींची एकत्रित सलगता उपलब्ध होत नाही. तसेच जमीनीच्या प्रत्येक ठिकाणावर जाण्यासाठी पोहच रस्ता उपलब्ध नाही, तसेच सर्व्हे न.२५२/१अ क्षेत्र ०-४०-० हे. आर क्षेत्रामध्ये मसणवट (स्मशानभूमी) आहे. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या सर्व्हे नंबरच्या जमीनी मल्टी मॉडल लॉजिस्टिक पार्कसाठी संपादन करणे संयुक्तीक होणार नाही असा निष्कर्ष मऔवि महामंडळाने काढला आहे.

भिवंडी तालुक्यात लॉजिस्टिक पार्क व औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेबाबत सुयोग्य जागेची पाहणी करुन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात सिकलसेल, थॅलेसेमिया व हिमोफिलिया रुग्णांकरिता उपचार केंद्र (डे-केअर युनिट) व औषधोपचार केंद्र सुरु करणेबाबत

**(१७) * ३५५९ श्री.गोपिचंद पडळकर (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात सिकलसेल, थॅलेसेमिया व हिमोफिलिया रुग्णांकरिता उपचार केंद्र (डे-केअर युनिट) व औषधोपचार केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी थॅलेसेमिया व सिकलसेल संघटना, यवतमाळ या संस्थेने मा.मुख्यमंत्री व मा.आरोग्य मंत्री यांचेकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवदेनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई वगळता राज्यात कुठेही थॅलेसेमिया व सिकलसेल सेंटर नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयात या आजाराच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून येथे उपचाराकरिता शासनाने कुठलीही यंत्रणा उभी केली नाही तसेच खाजगी रुग्णालयात रुग्णांना उपचार घेणे आर्थिकदृष्टया शक्य होत नसल्यामुळे उपचाराअभावी रुग्णांना मृत्यूशी झुंज द्यावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्ह्यात सिकलसेल, थॅलेसेमिया व हिमोफिलिया रुग्णांकरिता उपचार केंद्र (डे-केअर युनिट) व औषधोपचार केंद्र सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) सदर निवेदन जिल्हा शल्य चिकित्सक यवतमाळ यांना प्राप्त झाले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) सिकलसेल रुग्णांच्या तपासणी, निदान व उपचाराकरिता उपजिल्हा रुग्णालय, पांढरकवडा येथे डे-केअर युनिट तयार करण्यात आले आहे. तसेच हिमोफिलिया रुग्णांच्या उपचाराकरिता जिल्हा महिला व बाल रुग्णालय, यवतमाळ येथे डे-केअर कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ येथे सिकलसेल व थॅलेसेमिया रुग्णांच्या उपचाराकरिता राखीव बेडची व्यवस्था उपलब्ध असून या रुग्णांना आवश्यकतेनुसार मोफत रक्त संक्रमण करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव पंचायत समितीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * ५६५४ श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव पंचायत समितीमध्ये विविध कामांमध्ये बांधकाम कंत्राटदार यांचेकडून सादर केलेल्या जीएसटी, कामगार विमा, १० टक्के ठेवी यांसह इतर कपाती रकमांमध्ये अनियमितता करुन मोठया प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याअनुषंगाने सादर करण्यात आलेल्या २०० पेक्षा अधिक धनादेशांची तपासणी चौकशी समितीमार्फत करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील अनियमिततेची चौकशी मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य व लेखा वित्त अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखालील नेमण्यात आलेल्या समितीकडून सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेच्या वसुलीसह यातील दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) (२) (३) व (४) होय, हे खरे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ रोजीच्या आदेशान्वये, लेखाधिकारी, अर्थ विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्यामार्फत चौकशी समिती नेमण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी चौकशी अहवाल सादर केला. सदर अहवालानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन ०१ एप्रिल, २०१८ ते दिनांक ३१ मार्च, २०२३ या कालावधीत झालेल्या अपहारीत रकमेच्या वसुलीबाबत ४ कर्मचाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कार्यवाही करण्याबाबत कारणे दाखवा नोटीस व विभागीय चौकशी प्रस्तावित केली. त्यानुसार १ कनिष्ठ सहाय्यक व तत्कालिन रोखपाल यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच झालेल्या अपहाराबाबत संबंधित कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यासाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सेनगाव यांना प्राधिकृत केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील समस्यांचे निराकरण करणेबाबत

**(१९) * १५३ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या (डॉक्टर) वसतिगृहाची दुरवस्था झाली असून सदरहू रुग्णालयांत २५० निवासी डॉक्टरांकरिता वसतिगृह उभारण्याचे कामही सद्य:स्थितीत प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयात अनेक सोयीसुविधांचा अभाव असून सद्य:स्थितीत डॉक्टर / कर्मचारी यांची पदे रिक्त असल्याचे दिनांक ११ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयात रात्रकालीन रुग्णसेवेसाठी आपत्कालीन विभाग व कॅज्युअल्टी यावर लक्ष ठेवण्यासाठी तत्कालीन अधिष्ठाता यांनी सन २०१९ मध्ये “आकस्मिक भेट पथक” ( व्हिजिलन्स स्क्वॉड ) तयार

केले असून सद्य:स्थितीत सदर स्क्वॉड अस्तित्वात नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर रुग्णालयातील वसतिगृहाचे नूतनीकरण, डॉक्टर / कर्मचारी यांची रिक्त पदे तातडीने भरणेसह "आकस्मिक भेट पथक" कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निवासी डॉक्टरांकरिता २५० खोल्यांचे वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण करुन महाविद्यालयास हस्तांतर करण्यात आले आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

सदर संस्थेच्या महाविद्यालयात एकूण ८८७ पदे मंजूर असून एकूण ६५६ पदे भरलेली आहेत. तसेच सदर रुग्णालयात एकूण २३२७ पदे मंजूर असून एकूण १७०५ पदे भरलेली आहेत. रिक्त पदे भरणेबाबतची कार्यवाही शासन / संचालनालय स्तरावर सुरु आहे.
(३) नाही.
(४) व (५) सदर संस्थेत निवासी डॉक्टरांना नवीन वसतिगृह उपलब्ध असून, अध्यापकांची सरळसेवा व पदोन्नती कोटयातील पदे तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. संस्थेतील अधिक्षक व त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी हे वेळोवेळी व नियमितपणे आपत्कालीन विभाग व कॅज्युअल्टी येथे भेट देत असतात.

-----------------

## राज्यात "एकल" योजनेंतर्गत लाभार्थ्यांना नियमित अनुदान मिळणेबाबत

**(२०) * ४४९९ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी सुरु केलेल्या "एकल" योजनेचे अनुदान मिळण्यास दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेंतर्गत मिळण्याऱ्या अनुदानाच्या मंजुरीसाठी लागणारा वेळ, उत्पन्नाची अट, वयाची मर्यादा यामुळे अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेत वयाची मर्यादा २५ वर्षे, उत्पन्नाची अट रद्द करणे व अनुदान रक्कमेत रु.५ लाखापर्यंत वाढ करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन या योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) हे खरे नाही.

महिला व बाल विकास विभागाकडून राज्यात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांसाठी "एकल" नावाची योजना राबविली जात नाही.

तथापि महिला व बाल विकास विभागामार्फत ० ते १८ वयोगटातील अनाथ, निराधार, निराश्रीत, बेघर व अन्य प्रकारे आपत्ती असलेल्या बालकांचे संस्थाबाह्य आणि कौटुंबिक वातावरणामध्ये संगोपन व्हावे याकरिता या विभागाकडून "क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना" राबविली जात आहे.

बाल संगोपन योजनेचा लाभ अनाथ, जी बालके दत्तक देणे शक्य होत नाही, एक पालक असलेली व Family Crisis मध्ये असलेली बालके, घटस्फोट, विभक्तीकरण, परित्याग, अविवाहीत मातृत्व, गंभीर आजार, पालक रुग्णालयामध्ये असणे इ. कारणांमुळे विघटीत झालेल्या एक पालक असलेल्या कुटुंबातील बालके, कुष्ठरुग्ण, व जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची बालके, एच. आय. व्ही. ग्रस्त/ बाधित बालके, तीव्र मतिमंद बालके, दोन्ही पालक अपंग आहेत, अशी बालके, पालकांमधील तीव्र वैवाहीक बेबनाव, अती हेटाळणी व दुर्लक्ष, न्यायालयीन किंवा पोलीस तक्रार प्रकरणातील बालकांना बाल संगोपन योजनेचा लाभ देण्यात येतो.

राज्य शासनाच्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेंतर्गत १,००,२३६ लाभार्थ्यांना रू.१०१.४६ कोटी इतका निधी डीबीटी द्वारे वितरीत करण्यात आलेला आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत निधी वितरीत करण्यात येत असल्याने याबाबत दिरंगाई होत नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गुहागर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील बंद केलेली एमआयडीसी सुरु करणेबाबत

**(२१)** * **१९० श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील १४ गावांच्या हद्दीमध्ये मंजूर असलेली मार्ग ताम्हाने-देवघर एमआयडीसी रद्द करण्याचा निर्णय तत्कालीन मा. उदयोग मंत्री यांनी दिनांक ७ फेब्रुवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास जाहीर केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीमध्ये टेक्स्टाईल पार्क, फुड प्रोसेसिंग व लॉजिस्टिक बेस असे प्रदूषणविरहित उदयोग उभे राहणार असल्याने परिसरातील हजारो गरजूंना रोजगार उपलब्ध होणार होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू एमआयडीसी रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर एमआयडीसी सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) व (४) मार्ग ताम्हाणे औद्योगिक क्षेत्र स्थापन करणेसाठी चिपळूण तालुक्यातील मौजे पाथर्डी, उमरोली, तळेगाव, मार्ग ताम्हाणे, मार्ग ताम्हाणे खुर्द, आंबेरे बुद्रुक व कळमुंडी या गावातील १३९२.४९.०४ हे.आर. क्षेत्र तसेच गुहागर तालुक्यातील मौजे मढाळ, देवधर, झोंबडी, गिमवी, चिखली, मुंदर व मुंढर खुर्द या गावातील १९६७.६१.०४ हे. आर क्षेत्र असे एकूण ३३६०.१०.०८ हे. आर क्षेत्रास म. औ. वि. अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ च्या तरतुदी लागू करण्याबाबतची अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात भाग ४ ब मध्ये दिनांक ०९/०९/२०१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती.

तद्‌नंतर जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत सदर जमिनीची भूसंपादन कार्यवाही चालू करणेसाठी गाववार विहित भूसंपादन प्रस्ताव सादर करणेत आले होते. तथापि, प्रस्तुत भूसंपादनास संबंधित ग्रामपंचायतीनी ठराव करुन प्रचंड विरोध दर्शविला.

प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रातील ग्रामपंचायतींचे भूसंपादनास विरोध असल्याबाबतचे ठराव विचारात घेवून, दिनांक ०२/०१/२०२४ रोजी सदर क्षेत्र विना अधिसूचित करण्याबाबतचा निर्णय शासनामार्फत घेण्यात आला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील गर्भवती मातांना जननी सुरक्षा योजना तसेच शिशु सुरक्षा कार्यक्रमांतर्गत लाभ मिळत नसल्याबाबत

**(२२) * ४०१४ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील गर्भवती मातांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला असून येथील विविध शासकीय रुग्णालयांतील बहुतांश सोनोग्राफी मशीन बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील रुग्णालयांमध्ये सोनोग्राफी सुविधेअभावी गरोदर मातांना खाजगी दवाखान्यातून ८०० ते १००० रुपये इतकी रक्कम आकारुन सोनोग्राफी करावी लागत असून अनेक ठिकाणी प्रसूतीसाठी आलेल्या गरोदर मातांना सोनोग्राफीशिवाय रुग्णालयात दाखल करुन उपचार केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, गरोदर मातांना प्रसूतीच्या काळात जननी सुरक्षा योजना व जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत रु.५१००/- देय असतानाही त्यांच्या खात्यात सदर रक्कम गत एक वर्षापासून जमा झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन योजनेचा लाभ गरजू महिलांना देण्यासह यातील दोषींवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय अधिनस्त उपजिल्हा रुग्णालय डहाणू, कासा व जव्हार तसेच ग्रामीण रुग्णालय मोखाडा, पालघर व वाडा या संस्थांमध्ये सोनोग्राफी सेवा उपलब्ध असून सोनोग्राफी मशीन चालू आहेत. सदर रुग्णालयांत दाखल होणाऱ्या गर्भवती मातांना मोफत सोनोग्राफी सेवा पुरविल्या जाते.

(३) व (४) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती, जमाती व बीपीएल कार्डधारक मातांना प्रसूती पश्चात जननी सुरक्षा योजनेंतर्गत शहरी भागातील रहिवासी असल्यास रुपये ६००/- व ग्रामीण भागातील रहिवासी असल्यास रुपये ७००/- याप्रमाणे आर्थिक लाभ दिला जातो.

तसेच जननी शिशु सुरक्षा योजनेंतर्गत रुपये ५१००/- लाभार्थीला दिले जात नसून गरोदर मातेस मोफत आहार, औषधोपचार तसेच संदर्भ सेवा व मातेला व बालकाला घरी सोडण्यासाठी रुग्णवाहिका दिली जाते. त्यामुळे लाभार्थ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केसरजवळगा (ता.उमरगा, जि. धाराशिव) गावातील गांधी विद्यालयातील विद्यार्थ्यांना दिलेल्या गोळ्यांमुळे झालेला त्रास

**(२३) * ३६२१ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केसरजवळगा (ता.उमरगा, जि.धाराशिव) येथील गांधी विद्यालयात विद्यार्थ्यांना रक्तवाढीसाठी देण्यात आलेल्या आयर्न फॉलिक ॲसिडच्या गोळयांमुळे सुमारे १९ विद्यार्थ्यांना उलटया व मळमळचा त्रास झाल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना उपचाराकरिता मुरुम येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे

ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट औषध पुरवठा करणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करण्याची मागणी पालकांनी करुनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदाराविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) सदर औषधांची तपासणी एन.ए.बी.एल. या शासन मान्यता प्राप्त लॅब कडून करण्यात आलेली असून सदर औषधे प्रमाणित असल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रांना वितरित करण्यात आलेली आहेत.

सदर प्रकरणी अन्न व औषधी प्रशासन विभागाकडून सदर बॅचचा औषधी नमुना तपासणीकरिता घेण्यात आलेला आहे. तपासणी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. तपासणी अहवाल प्राप्त होताच योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून रुग्णालयामधील स्वच्छतेचा ठेका बेकादेशीरपणे देण्यात आल्याबाबत

**(२४)** * **३८७८ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयामध्ये सन २०१८ पासून सलग ४ वर्षे मे.डी.एम.एंटरप्रायजेस या कंत्राटदाराला बेकायदेशीरपणे कंत्राट देण्यात आले असून सन २०२२ नंतर राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत करिअर झोन या कंपनीची निविदा मान्य होऊनही त्यांना काम न देता पुन्हा त्याच कंत्राटदाराला ११ महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठेकेदाराकडून स्वच्छतेची कामे निविदेतील नियम व अटीनुसार होत नसल्याच्या शेकडो तक्रारी रुग्णालय प्रशासनाकडे रुग्ण व नागरिकांनी करुनही त्याकडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रितसर निविदा प्रक्रिया राबवून सदरहू प्रक्रियेत करिअर झोन या कंपनीची निवड झाली असतानाही त्यांना हे काम न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१), (२) व (३) सन २०१८ मध्ये संस्थास्तरावर ई-निविदा प्रक्रिया राबवून मे. डी. एम. एंटरप्रायजेस यांना ससून रुग्णालयामध्ये साफसफाईचे कंत्राट ११ महिन्यांसाठी देण्यात आले होते. त्यानंतर नव्याने निविदा प्रक्रिया राबवुन नविन कंत्राटदाराची नियुक्ती होई पर्यंत मुदत वाढ देण्यात येत होती. सन २०२१-२२ मध्ये राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमध्ये मे. करिअर झोन एल एल ही कंपनीचे दर न्युनतम आले होते. परंतु, निविदा प्रक्रियाबाबत उच्च न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यामुळे सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.कोथळा (पिंगळी)(ता.मानवत,जि.परभणी) येथील कोल्हापूरी बंधाऱ्याचे कामात झालेला गैरव्यवहार

**(२५) * ६५३७ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कोथळा (पिंगळी) (ता.मानवत, जि.परभणी) येथे कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाला असून कंत्राटदाराला मूळ अंदाजपत्रकापेक्षा जास्तीचे देयक अदा करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी नेमलेल्या जिल्हा जलसंधारण अधिकारी जालना व नांदेड यांची द्विसदस्यीय तपासणी समिती गठीत केली असता समितीसमोर परभणी जिल्हा जलसंधारण अधिकारी, श्री.कविराज कुच्चे यांनी चुकीची माहिती तसेच बनावट व खाडाखोड केलेली कागदपत्रे सादर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मूळ अंदाजपत्रकासोबतच्या व समितीला सादर केलेल्या नकाशात अक्षांश व रेखांश वेगवेगळे असून सदरहू कोल्हापूरी बंधाऱ्याला कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता नसताना व कोणतेही कार्यारंभ आदेश नसताना श्री.कुच्चे यांनी सदरील प्रकरणात जाणूनबुजून बनावट माहिती समितीसमोर सादर केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर निलंबनाच्या कारवाईसह गुन्हा दाखल कंत्राटदाराकडून या रकमेची वसुली करणेसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) व (२) कंत्राटादारास मौ. कोथळा को.प.ब. क्र.१ या बंधाऱ्याच्या अंदाजपत्रकापेक्षा अधिकचे देयक अदा केलेले नाही. तथापि, सदर बंधाऱ्याच्या कामाच्या चौकशीसाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी द्विस्तरीय चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीस जिल्हा जलसंधारण अधिकारी, परभणी यांनी उपलब्ध करून दिलेल्या कागदपत्रानुसार मौ. कोथळा को.प.ब. क्र.१ या बंधाऱ्याच्या अंदाजपत्रकामध्ये तालुका व जिल्हा परभणी असे नमूद आहे, परंतु त्याच अंदाजपत्रकामधील अक्षांश रेखांश मानवत तालुक्यातील असल्याचे चौकशी समितीस आढळून आले आहे.

(३) चौकशी समितीच्या अहवालानुसार मौ. कोथळा को.प.बंधारा क्र. ०१ या बंधाऱ्याच्या कामास तालुका व जिल्हा परभणी येथे प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, निविदा मान्यता व कार्यारंभ आदेश प्राप्त असतांना सदर बंधाऱ्याचे काम मानवत तालुक्यामध्ये करण्यात आले आहे.

(४) सदर अनियमिततेच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत श्री. कुच्चे यांनी मौ. कोथळा को. प. बंधारा क्र. १ या कामाच्या जागा बदलीसंदर्भात मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन क्र.९८७२/२०२४ दाखल केली आहे. त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.२५/०९/२०२४ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत. ‘Until further orders, the status quo with regard to the service condition of the petitioner shall be maintained and no coercive step shall be taken without the leave of the court.’

मा. न्यायालयाच्या उक्त आदेशामुळे श्री.कुच्चे यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही अद्याप सुरु केलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जनआरोग्य योजनेंतर्गत रस्ते अपघातामधील रुग्णांसाठी पॅकेज वाढविणेबाबत

**(२६) * ४९६८ श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रस्ते अपघातांमधील गंभीर जखमींना उपचारासाठी जनआरोग्य योजनेंतर्गत लाभ मिळत असला तरी अपघाताशी संबंधित ऑर्थोपेडिक, न्यूरोसायन्स या दोन उपचारांवर अत्यल्प दराच्या पॅकेजेसमुळे रुग्ण लाभांपासून वंचित राहत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑर्थोपेडिक, न्यूरोसायन्स या उपचारांचा खर्च मोठया प्रमाणावर असून रुग्णांना जनआरोग्य योजनेंतर्गत याकरिता मिळणारा लाभ अत्यल्प असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत असून यामध्ये विमा कंपन्यांचा मात्र मोठा फायदा होत आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन जनआरोग्य योजनेंतर्गत अपघाताशी संबंधित सर्व उपचारांना उचित दर देवून या योनजेच्या पॅकेजमध्ये वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे नाही.

आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत रस्ते अपघाताशी संबंधित ओर्थोपिडिक -४८ पॅकेज आहेत या पॅकजचे दर रू.१०००/- पासून ५०,०००/- पर्यंत आहेत. न्यूरोसर्जरीचे १५ पॅकेजेस आहेत याचे दर रू.१०,५५०/- पासून १,५०,०००/- पर्यंत आहेत. सदर पॅकेजचे दर कमी असल्याने रूग्णांवर उपचार करता येत नाही, अशा आशयाची अंगीकृत रूग्णालयांची मागणी किंवा तक्रार प्राप्त झालेली नाही.

दिनांक १ जुलै, २०२४ पासून एकत्रित आयुष्मान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. अंगीकृत रूग्णालयांच्या दाव्यांची अदायगी थेट राज्य आरोग्य हमी सोसायटी कडून होते.त्यामध्ये विमा कंपन्यांचा कोणताही सहभाग नाही. त्यामुळे विमा कंपन्यांचा फायदा होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) विस्तारित आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये एकूण १३५६ उपचारांचा समावेश आहे. त्यामध्ये रस्ते अपघाताशी संबंधित ओर्थोपिडिक -४८ व, न्यूरोसर्जरीचे १५ पॅकेजेस अशा एकूण ६३ पॅकेजेसचा समावेश आहे. रस्ते अपघातग्रस्त राज्य /देशाबाहेरील व्यक्तींना शासननिर्णय दि. २८/०७/२०२३ नुसार अपघाताशी संबंधित एकूण १८४ उपचार अनुज्ञेय आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नंदुरबार जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांना मिळणाऱ्या मोफत गृहपयोगी संचापासून वंचित ठेवल्याबाबत

**(२७) * २५६३ श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नंदुरबार जिल्ह्यातील महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत बांधकाम कामगारांना गृहपयोगी भांडयांचा मोफत संच वाटप योजनेंतर्गत जिल्ह्यातील एकाच तालुक्यात सर्वाधिक लाभ दिला गेल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संच वाटपावेळी लाभार्थ्यांना जिल्ह्याच्या ठिकाणी बोलावून तीन-चार दिवस ताटकळत ठेवूनही संच वाटप करण्यात आले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अक्कलकुवा व धडगाव तालुक्यातील शेकडो पात्र लाभार्थ्यांना अद्यापपर्यंत या योजनेचा लाभ न देता कंत्राटदार व अधिकारी हे मनमानी पद्धतीने काम करीत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेतील पात्र सर्व लाभार्थ्यांना त्वरीत लाभ देणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगारांना माहे फेब्रुवारी, २०२४ पासून नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यात मिळून एकूण ४३,९७३ गृहपयोगी संच (भांडी संच) पुरवठादार संस्थेमार्फत वाटप करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

पुरवठादार संस्थेकडुन तालुकास्तरावर आयोजित केलेल्या शिबिरात कामगार त्यांचे वेळेनुसार संच घेण्यासाठी आलेले आहेत. त्यांना संच घेण्यासाठी बोलविण्यात आलेले नाही. काही दिवशी कामगार मोठया संख्येने आल्याने पुरवठादार यांनी कामगार परत जाऊ नयेत, याकरिता रात्री उशीरापर्यंत संच वाटप करण्यात आलेले आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

पुरवठादार संस्थेकडून मंडळाच्या पुरवठा आदेशात नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार नंदुरबार जिल्ह्यातील सर्व तालुक्यात शिबिराचे आयोजन करून मंडळांतर्गत नोंदीत बांधकाम कामगारांना गृहपयोगी संच (भांडी संच) नियमानुसार वाटप करण्यात आलेले आहे.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच वेळी गृहपयोगी संचाचे वाटप होत असल्याने नोंदीत कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने पुरवठादार संस्थेकडून तेवढा पुरवठा न झाल्याने नंदुरबार जिल्ह्यातील नोंदीत व पात्र कामगारांना संच वाटप करण्याची कार्यवाही चालू आहे. नंदुरबार जिल्ह्यात गृहपयोगी संच वाटपाबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात पेंटावेलेंट लसीचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(२८) * ५५५६ श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) येथील उपजिल्हा रुग्णालयात नवजात बालकांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची असलेली पेंटावेलेंट लस दिनांक ४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लस खाजगी रुग्णालयातून रु.३०००/- खर्च करून घ्यावी लागत असल्याने सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पेंटावेलेंट लस तातडीने उपलब्ध करुन देणे व भविष्यात अशाप्रकारे लसीचा तुटवडा निर्माण होऊ नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

जिल्हा स्तरावरील भांडार गृहाकडून दि.२१ जानेवारी, २०२५ रोजी पेंटावेलेंट लसीचा साठा उपलब्ध करुन घेण्यात आला आहे.

(३) E-vin प्रणालीच्या माध्यमातून लसीच्या गरजेप्रमाणे मागणी व वितरण केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परतवाडा (जि.अमरावती) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जवर्डी ते बेलज या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत

**(२९) * ४६०७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतवाडा (जि.अमरावती) येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत जवर्डी ते बेलज या ४ कि.मी.रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याऐवजी उपविभागीय अभियंता, शाखा अभियंता यांच्या संगनमताने कंत्राटदारांनी मातीकाम करून त्यावर डांबर टाकल्यामुळे अवघ्या काही दिवसांमध्येच हा रस्ता खराब झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी कोणत्याही अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी न करताच कंत्राटदारांची देयके मंजूर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची तक्रार ग्रामपंचायतीसह नागरिकांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट रस्त्यांच्या दुरुस्तीसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१), (२) व (३) सन २०१६-१७ मध्ये मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ अंतर्गत पॅकेज क्र. AMR-३० अंतर्गत प्ररामा १४ जवर्डी ते बेलज ता. अचलपूर, जि. अमरावती या ५.७५ कि.मी. लांबीच्या रस्त्याकरिता रू.३१७.४४ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तूत कामास दि.२४ एप्रिल, २०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले होते व विहित मुदतीत दि.२२ जानेवारी, २०१९ रोजी काम पूर्ण झाले आहे. सदरहू काम प्रगतीपथावर असतांना राज्य गुणवत्ता निरिक्षक व वरिष्ठ राज्य गुणवत्ता निरिक्षक यांच्यामार्फत तपासणी करून समाधानकारक शेरा प्राप्त झाल्यानंतरच ठेकेदाराची देयके अदा करण्यात आली आहेत. प्रस्तुत कामाचा दोष निवारण कालावधी ०५ वर्षाचा होता,सदरहू कालावधीत निविदा अटी व शर्तीनुसार खड्डे भरणे, झाडेझुडपे सफाई, बाजूपट्ट्या तासने, नाली साफसफाई इत्यादी कामांचा समावेश होतो. सदरहू कामे ठेकेदाराकडून नियमितपणे करून घेण्यात आली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरवणे (ता.पेण, जि.रायगड) येथील शासकीय आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थिनीचा चुकीचे औषध दिल्याने झालेला मृत्यू

**(३०) * ४६८२ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरवणे (ता.पेण, जि.रायगड) येथील शासकीय आश्रमशाळेतील कु.खुशबू नामदेव ठाकरे (इयत्ता ४ थी) या आदिवासी विद्यार्थिनीचा चुकीचे औषध दिल्याने मृत्यू झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थीनीला कुष्ठरोग नसतानाही आरोग्य केंद्राकडून कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमांतर्गत चुकीचा औषधोपचार केल्यामुळे अत्यवस्थ होऊन तिचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

कु. खुशबू नामदेव ठाकरे हिला कुष्ठरोग निदान निश्चितीपूर्वी ६ महिने देखरेखीखाली ठेवण्यात आले होते. कुसुम कार्यक्रमाअंतर्गत दि १६ डिसेंबर, २०२४ रोजी निदान निश्चिती करुन तिला बहुविध औषधोपचार सुरु करण्यात आला. कु. खुशबू नामदेव ठाकरे हिचा मृत्यु Fulminant Hepatic Failure due to Dapsone Induced Hypersensitivity मुळे झाला आहे, असा अहवाल आहे.

(३) याप्रकरणी चौकशी समितीचा अहवाल संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांना दि.२७/०२/२०२५ रोजी सादर झाला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्नच उद्‌भवत नाही

-----------------

## राज्यातील शासकीय भौतिकोपचारशास्त्र (फिजिओथेरपी) व व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल) पदव्युत्तर व पदवी आंतरवासित विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करणेबाबत

**(३१) * ४६१६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकमेव शासकीय भौतिकोपचारशास्त्र (फिजीओथेरपी) व व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल) पदव्युत्तर व पदवी आंतरवासिता विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात अनेक वर्षापासून वाढ झाली नसल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने व विद्यापीठ अनुदान आयोगाने शिफारस केल्यानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत, व आयुर्वेद महाविद्यालय, आणि भौतिकोपचारशास्त्र व व्यवसायोपचार संस्थांमधील अध्यापकांना व समकक्ष पदांना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन श्रेणी लागू करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार व्यवसायोपचारशास्त्र (Occupational Therapy) विभागातील सहाय्यक व सहयोगी प्राध्यापक पदोन्नतीपासून वंचित राहू नये म्हणून त्यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती) चा लाभ व त्या सर्व अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता आणि पदव्युत्तर भत्ता देण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अध्यापकांना ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन श्रेणी, तसेच सहाय्यक व सहयोगी प्राध्यापक यांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम (मानीव / कालबद्ध दर्जा पदोन्नती) चा लाभ व त्या सर्व अध्यापकांना व्यवसायरोध भत्ता आणि पदव्युत्तर भत्ता देण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिनस्त शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथे भौतिकोपचार व व्यवसायोपचार शाळा व केंद्र कार्यान्वित आहे.

शासन निर्णय दि.१२/०४/२०२२ अन्वये ७ व्या वेतन आयोगानुसार राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील अध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्किम, व्यवसायरोध भत्ता व पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असलेल्या अध्यापकांना पदव्युत्तर भत्ता लागू करण्यात आला आहे.

शासकीय भौतिकोपचारशास्त्र (फिजिओथेरपी) व्यवसायोपचार (ऑक्युपेशनल) पदव्युत्तर व पदवी आंतरवासिता विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत वैद्यकीय शिक्षण संचालनालयाकडून दिनांक ०४/०६/२०२४ व दिनांक १३/०२/२०२५ रोजी शासनास प्रस्ताव प्राप्त झालेला असून संबंधित विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण, खेड, गुहागर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील आरोग्य केंद्रातील समस्यांचे निराकरण करणेबाबत

**(३२) * २८८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्ह्यातील रामपूर (ता.चिपळूण) व वावे (ता.खेड) येथील श्रेणीवर्धन झालेल्या रुग्णालयातील पदभरती तसेच आबलोली (ता.गुहागर) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास तात्काळ मान्यता देण्याचे आदेश मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य यांनी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान देवूनही अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, गुहागर ग्रामीण रुग्णालयाची मुख्य इमारत, प्रयोगशाळा व कर्मचारी निवासस्थानांच्या इमारती वापरण्यास धोकादायक असल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला असून त्यायोगे सदर इमारत वापराकरिता बंद ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गुहागर ग्रामीण रूग्णालयात येणाऱ्या रुग्णांना उपचार, शस्त्रक्रिया, ऑपरेशन थिएटर, डिलिव्हरी रुम यांसह अन्य सुविधांकरिता शासनाने कोणती पर्यायी व्यवस्था केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन प्रलंबित प्रस्तावांना मान्यता देणे, रुग्णांना पर्यायी व्यवस्था उपलब्ध करणे, ग्रामीण रुणालयाच्या नवीन इमारत बांधकामास निधी उपलब्ध करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) रत्नागिरी जिल्ह्यातील रामपूर (ता. चिपळूण) व वावे (ता. खेड) येथील श्रेणीवर्धन झालेल्या ग्रामीण रूग्णालयांकरिता जागा उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे रूग्णालयासाठी पदनिर्मिती करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, आबलोली (ता. गुहागर) जि. रत्नागिरी चे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्याबाबतच्या प्रस्तावावर निकष तपासून योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(३) व (४) ग्रामीण रुग्णालय, गुहागर येथील मुख्य इमारत व प्रयोगशाळा तसेच वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांची निवासस्थाने खूप जूनी असून इमारत वापरण्यास धोकादायक झाली असल्याचे तथापि, वर्ग-१ व वर्ग-२ संवर्गातील अधिकाऱ्यांची व वर्ग-४ कर्मचाऱ्यांची शासकीय निवासस्थानांच्या इमारती वापरण्यास योग्य असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, गुहागर यांना कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, रत्नागिरी यांच्याकडून सदर इमारतीतील रुग्णालयाचे कामकाज तात्काळ थांबवून रुग्णालय अन्य ठिकाणी स्थलांतरीत करण्याबाबत वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, गुहागर यांना कळविले आहे. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, गुहागर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रूग्णालयीन नवीन इमारत व निवासस्थान बांधकामाकरिता अंदाजपत्रक व आराखडे मागविले आहेत. सदर अंदाजपत्रक व आराखडे अद्याप अप्राप्त आहेत.

ग्रामीण रूग्णालय, गुहागर येथील धोकादायक नसलेल्या मेल वॉर्ड व १० बेडच्या इमारतीमध्ये रूग्णांना उपचार देण्यात येतात. धोकादायक नसलेल्या इमारतीमध्ये मायनर सर्जरी प्रसुती करण्यात येत असून शस्त्रक्रियागृहा अभावी केवळ गुंतागुंतीच्या प्रसुती संदर्भित करण्यात येतात.

(५) उपरोक्त १) ते ४) मध्ये नमूद केल्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात पात्र दिव्यांगांना निकषानुसार व गुणवत्तेच्या आधारे प्रमाणपत्र मिळणेबाबत

**(३३) * ३२२६ श्री.सुरेश धस (आष्टी), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.प्रदिप जैस्वाल (औरंगाबाद मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिव्यांगांची गैरसोय होऊ नये यासाठी जिल्ह्यातील विशेषज्ञाची समिती स्थापन करुन तालुकास्तरावरील १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र सुविधा उपलब्ध करुन देणे तसेच महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शुक्रवारी दिव्यांग प्रमाणपत्र शिबिरे आयोजित करुन प्रलंबित दिव्यांग प्रमाणपत्राचा निपटारा करावा असे निर्देश उपजिल्हा रुग्णालयांना सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ससून तसेच राज्यातील जिल्हा सामान्य रूग्णालयातून दिव्यांग असल्याचे बनावट प्रमाणपत्रे घेऊन राज्यातील हजारो लोकांनी शासकीय नोकरी मिळवली असल्याचा गैरप्रकार निदर्शनास आला आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयातील दिव्यांग प्रमाणपत्र वितरण कक्षातील अधिकारी, कर्मचारी यांनी युजर आय.डी व पासवर्डचा निष्काळजीपणाने वापर करुन विनापडताळणी दिव्यांगांना बनावट प्रमाणपत्रे वितरीत केल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून सदर बनावट प्रमाणपत्र वितरीत केल्याचा निष्कर्ष आरोग्य उपसंचालक, नाशिक यांनी नियुक्त केलेल्या चौकशी समितीने नोंदविलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित बनावट प्रमाणपत्र वितरीत करण्याऱ्या दोषींवर कारवाई करणेसह वितरीत झालेली बनावट प्रमाणपत्र रद्द करणे तसेच पात्र दिव्यांग्यांना निकषानुसार व गुणवत्तेच्या आधारे प्रमाणपत्र मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) होय.
(२) काही तक्रारी विविधस्तरावंर प्राप्त झाल्या आहेत. प्रकरणनिहाय तपासून उचित कार्यवाही आवश्यक असल्याने संबंधितांना त्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.२९/०५/२०१९ अन्वये निवड प्रक्रियेदरम्यान अथवा नियुक्तीच्या दरम्यान दिव्यांग प्रमाणपत्र तपासणी/फेरतपासणी करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिका-याला आहेत.
(३) होय.
(४) जिल्हा शल्य चिकित्सक, अहिल्यानगर यांनी दिनांक ०९/०९/२०२४ अन्वये तोफखाना पोलीस स्टेशन अहिल्यानगर येथे दोषींवर FIR दाखल करून संबंधित ४ दिव्यांगधारकांची प्रमाणपत्रे रद्द करण्यात आलेली आहे. चौकशी अहवालामध्ये दोषी कंत्राटी कर्मचारयांची सेवा दिनांक १५/१०/२०२४ च्या आदेशान्वये समाप्त करण्यात आलेली आहे. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांनी या प्रकरणी हयगय करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित करण्याकरिता दोषारोप जोडपत्रे सादर करण्याबाबत दि.१६/०१/२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा शल्यचिकित्सक, अहिल्यानगर यांना कळविले आहे. पुढील तपास पोलीसांमार्फत सुरू आहे. पात्र दिव्यांग्यांना निकषानुसार व गुणवत्तेच्या आधारे प्रमाणपत्र देण्याबाबतची कार्यपध्दती शासन निर्णय दि.१४/०९/२०१८ नुसार विहित केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भोसरी (जि.पुणे) येथे कामगारांसाठी बांधण्यात आलेली पाण्याची टाकी कोसळून झालेली दुर्घटना**

**(३४) * ४८२७ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सदगुरु नगर भोसरी (जि.पुणे) येथील रेड झोन हद्दीतील लेबर कॅम्प येथे पाण्याची टाकी फुटून ५ कामगारांचा मृत्यू तर ७ कामगार जखमी झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगार पुरवठादार श्री.लोमटे यांनी अल्प कालावधीमध्ये अकुशल कामगारांकडून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन सदरहू टाकीचे बांधकाम केल्यामुळे ही टाकी फुटल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कारवाई करण्यासह मृत व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सदगुरू नगर, भोसरी, जि.पुणे या ठिकाणी कंत्राटी कामगार यांच्या राहण्याकरीता उभारण्यात आलेल्या लेबर कॅम्पमध्ये कामगारांच्या वापराकरीता व सामुदायिक आंघोळीकरीता एक पाण्याची टाकी उभारण्यात आली होती. सदर पाण्याच्या टाकीच्या ठिकाणी दिनांक २४/१०/२०२४ रोजी पहाटे ५.३० ते ६.०० च्या सुमारास काही

कामगार आंघोळ करीत असताना, नव्याने बांधण्यात आलेली पाण्याची टाकी फुटल्याने त्याचे अवशेष कामगारांच्या अंगावर पडल्याने ०५ कामगारांचा मृत्यू झाला असून ०८ कामगार गंभीर जखमी झाले आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर अपघात प्रकरणी भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १०५, कलम १२५ (ए) व कलम १२५ (बी) अन्वये गुन्हा (FIR) क्र. ०६५९, दि. २४.१०.२०२४ रोजी भोसरी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड, पुणे येथे गुन्हा दाखल केलेला आहे. त्यानुषंगाने पोलीस विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

अपर कामगार आयुक्त, पुणे विभाग यांनी दिनांक २३/१०/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुख्य आस्थापना/कंत्राटदार यांच्यामार्फत मयत कामगाराचे शव त्यांचे मुळ गावी नेण्याकरीता व अत्यंविधीसाठी तसेच तातडीची आर्थिक मदत म्हणून रक्कम रू. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख हजार) आणि मयत कामगाराच्या कायदेशीर वारसदारांना तातडीची मदत म्हणून प्रत्येकी रु. १०,००,०००/- (अक्षरी रुपये दहा लाख मात्र) अदा करण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे जखमी कामगारांचा संपूर्ण औषधोपचार खर्च, उपचारादरम्यान पूर्ण वेतन अदा करणे आणि जखमी कामगार पूर्णत: बरे झाल्यावर त्यांना पुर्ववत कामावर घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर घटनेच्या अनुषंगाने संबंधितांविरोधात मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोसरी न्यायालय, पिंपरी-चिंचवड, पुणे येथे खटले दाखल करण्यात आले आहेत.

मयत कामगाराच्या वारसदारांना अपघात नुकसान भरपाई देणेबाबत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयास दिनांक २४/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव (१) (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.